# नगर परिषद कार्यालय, मलकापूर

प्रशासकीय सभा दिनांक २२/०२/२०२३

---

## कार्यवृत्त

आज दिनांक २२/०२/२०२३ रोजी सकाळी ११ वाजता मा. प्रशासक महोदय नगर परिषद मलकापूर यांचे दालनात मलकापूर नगर परिषदेच्या बांधकाम व पाणी पुरवठा विभाग यांनी सादर केलेल्या खालील विषयाकरिता प्रशासकीय सर्वसाधारण सभेचे आयोजन करण्यात आले होते.

विषय क्र.१ :- मलकापूर शहरातील विकास कामांना मंजुरी मिळणे बाबत

विषय क्र.२ :- आमदार स्थानिक विकास कार्यक्रम २०२२-२०२३ अंतर्गत मौजे मलकापूर येथे न.प. मालकीच्या जागेवर सलीम चव्हाण यांचे घरापासून आरिफभाई रॉकेलवाले यांचे घरापर्यंत पाईप लाईन टाकणे.

---

**विषय क्र.१ :- मलकापूर शहरातील विकास कामांना मंजुरी मिळणे बाबत**

उपरोक्त विषयास अनुसरून नगर अभियंता बांधकाम विभाग यांनी सादर केलेल्या अहवालामध्ये मा. जिल्हा नियोजन अधिकारी जिल्हा नियोजन समिती बुलढाणा यांचे पत्र क्र जीनिस/जीवायो/११५९/२०२२ दि. २३/१२/२०२२ नुसार मा. खा. श्री प्रतापराव जाधव बुलढाणा लोकसभा मतदारसंघ यांचे सन २०२२-२३ अंतर्गत प्राप्त निधीतून खालील प्रमाणे करावयाच्या कामाबाबत प्रस्ताव सादर करण्याकरिता कळविले आहे

१) मलकापूर नगरपरिषद हद्दीतील पुरोहित कॉलनी मधील हनुमान किराणा ते गवळी यांच्या घरापर्यंत रस्ता बांधकाम करणे

2) मलकापूर न प हद्दीतील जाधव वार्डातील हनुमान मंदिरासमोरून ते नांदुरा रोड पर्यंत रस्ता बांधकाम करणे

उपरोक्त कामे जिल्हा वार्षिक नागरी दलितेत्तर योजना / जिल्हा वार्षिक नगरोत्थान योजना / जिल्हा वार्षिक विशेष रस्ते अनुदान योजना / आमदार निधी / खासदार निधी अथवा इतर कोणत्याही उपलब्ध निधीतून करण्यास ही सभा मान्यता देत आहे

**विषय क्र.२ :- आमदार स्थानिक विकास कार्यक्रम २०२२-२३ अंतर्गत मौजे मलकापूर येथे न.प. मालकीच्या जागेवर सलीम चव्हाण यांचे घरापासून आरिफभाई रॉकेलवाले यांचे घरापर्यंत पाईप लाईन टाकणे.**

उपरोक्त विषयास अनुसरून पाणीपुरवठा अभियंता पाणीपुरवठा विभाग मलकापूर नगरपालिका यांनी सादर केलेला अहवालामध्ये माननीय आमदार महोदय विधानसभा सदस्य तसेच माननीय जिल्हा नियोजन समिती जिल्हाधिकारी कार्यालय बुलढाणा यांच्या पत्रानुसार आमदार स्थानिक विकास कार्यक्रम २०२२-२३ अंतर्गत मौजे मलकापूर येथे नगरपरिषद मालकीच्या जागेवर सलीम



Scanned by Scanner Go

चव्हाण यांचे घरापासून ते आरिफ भाई रॉकेल वाले यांचे घरापर्यंत पाईपलाईन टाकण्याबाबत नमूद केलेले आहे. त्यानुसार माननीय आमदार महोदय यांनी प्रस्तावित केलेली काम हे मलकापूर नगर परिषदेच्या हद्दीबाहेरील असल्याकारणाने सदर बाब ही माननीय प्रशासक महोदय नगरपरिषद मलकापूर यांचे निदर्शनास आणून देण्यात आली त्यानुसार माननीय प्रशासक महोदय यांचे दिनांक ०९/०२/२०२३ च्या आदेशानुसार पाणी हे जीवनावश्यक घटक असल्याने कामास प्राधान्य देऊन पुढील कार्यवाही करण्यास मान्यता दिलेली आहे.

ठरविण्यात येते की उपरोक्त सर्व बाबींचा विचार करता फातिमा नगर मधील वाढीव पाणीपुरवठा पाईपलाईन टाकण्याच्या कामास व येणारा खर्च आमदार स्थानिक विकास कार्यक्रम निधीतून करण्यास ही सभा मान्यता देत आहे

आर यु सुरडकर
प्रशासक
नगरपरिषद मलकापूर



Scanned by Scanner Go